श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित
भ. क. ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे

# श्रीक्षेत्र डेरवण वार्तापत्र

| वर्ष-६, अंक-१ | जानेवारी-२०१८ | विनामूल्य खासगी वितरणासाठी | मासिक, पाने ४ |

## धर्मादाय आयुक्त कार्यालय व वालावलकर रुग्णालय डेरवण यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य शिबिर संपन्न

दि. ०३.१२.२०१७ या दिवशी मा. धर्मादाय आयुक्त कार्यालय, रत्नागिरी व भ.क.ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण यांच्या संयुक्त विद्यमाने रुग्णालयात व आरोग्य सेवेच्या फिरत्या पथकाद्वारे गरीब रुग्णांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.

या मोफत आरोग्य शिबिरासाठी हडकणी क्रशर झोपडपट्टी, सरंद, माखजन, कुटरे, येगांव, डेरवण, दहिवली, अबिटगांव येथील एकूण १४७ रुग्ण रुग्णालयात आणण्यात आले. डॉ. सुवर्णा पाटील, डॉ. विजयकुमार पोतदार, डॉ. अभय देसाई, डॉ. नेताजी पाटील, डॉ. धुमाळे, डॉ. सुमित सोनवणे, डॉ. प्रितीकांत साहू, डॉ. किरण जोशी, डॉ. संहिता कोसे, डॉ. भूषण वरपे, डॉ. राजश्री कुलकर्णी आदींनी या रुग्णांची तपासणी केली. रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांनी आवश्यकतेनुसार एक्स-रे, सोनोग्राफी, रक्त व लघवी तपासणी करून योग्य ते औषधोपचार मोफत केले. तसेच आलेल्या सर्व रुग्णांची भोजन व नेण्या-आणण्याची व्यवस्था रुग्णालयाच्या वतीने नि:शुल्क करण्यात आली होती.

डॉ. प्रतिभा पाटील व डॉ. पल्लवी कांबळे या फिरत्या आरोग्य सेवा पथकातील डॉक्टरांनी तिवरे राजवाडावाडी येथील ५७, कादवड कोंडबावाडी येथील २४, सह्याद्री खोऱ्यातील अतिदुर्गम भागातील कळकवणे आदिवासीवाडी येथील ३० रुग्ण व बहादूर शेख नाका झोपडपट्टी येथील ३२ रुग्ण अशा एकूण १४३ रुग्णांची तपासणी करून योग्य ते औषधोपचार मोफत केले. एकूण २९० रुग्णांची आरोग्य तपासणी करून त्यांना मोफत औषधोपचार करण्यात आले.





# फेलोशिप अभ्यासक्रम डेरवण येथे सुरू

श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्टच्या भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालयात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्याशी संलग्न 'फेलोशिप अभ्यासक्रमा'ची सुरवात शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ या वर्षापासून झाली आहे.

या अभ्यासक्रमासाठी किमान शैक्षणिक पात्रता एम.डी. किंवा एम.एस. उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. या फेलोशिपसाठी सायटोपॅथॉलॉजी, जॉईंट रिप्लेसमेंट, स्पाइन सर्जरी, हाय रिस्क ऑब्स्टेट्रीक्स, इमर्जन्सी मेडिकल अँड ट्रॉमाकेअर हे पाच विषय अभ्यासक्रमासाठी आहेत. अभ्यासक्रम सुरू झाले असून या अभ्यासक्रमाचा कालावधी एक वर्षाचा आहे.

त्याचसमवेत रजिस्टर्ड होमिओपॅथी डॉक्टरांसाठी 'मॉडर्न फार्माकोलॉजी' हा एक वर्षाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू झाला आहे. वर नमूद केलेल्या सर्व अभ्यासक्रमांसाठी डॉ. सौ. सुवर्णा पाटील (भ्रमणध्वनी क्रमांक ९९२१२५१६९५) व श्री. गौतम तेंडुलकर (भ्रमणध्वनी क्रमांक ८९५६०६७७४३) यांच्याशी सकाळी ९.०० ते सायंकाळी ५.०० पर्यंत संपर्क साधावा.

# बेसिक सर्जिकल स्किल वर्कशॉप

भारतात ग्रामीण भागात प्रथमच 'दि रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्स ऑफ एडिनबर्ग', यु. के. आणि भ.क.ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण यांच्या संयुक्त विद्यमाने वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असलेल्या शल्य विशारदांना 'बेसिक सर्जिकल स्किल वर्कशॉप'ची सुवर्णसंधी प्राप्त होत आहे. ही कार्यशाळा दि. १२ फेब्रुवारी ते दि. १७ फेब्रुवारी २०१८ या कालावधीत होणार आहे. या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या भारतातील शल्यविशारदांना इंग्लंड येथील अतिशय नामवंत आणि अत्यंत अनुभवी उच्च विद्याविभूषित डॉ. इयान वॉलेस व डॉ. पॉल या शल्यविशारदांचे मार्गदर्शन मिळणार असून कार्यशाळेत सहभागी डॉक्टरांना दि रॉयल कॉलेज ऑफ सर्जन्स ऑफ एडिनबर्ग, यु. के. यांच्याकडून प्रमाणपत्र मिळणार आहे. या कार्यशाळेचा कालावधी खालीलप्रमाणे आहे.

- पहिली बॅच - सोमवार, दि. १२ फेब्रुवरी २०१८ ते मंगळवार, दि. १३ फेब्रुवारी २०१८
- दुसरी बॅच - शुक्रवार, दि. १५ फेब्रुवारी २०१८ ते शनिवार, दि. १६ फेब्रुवारी २०१८

या कार्यशाळेत मेडिकल स्टुडन्ट्स, मेडिकल इंटर्न्स, सर्जरी रेसिडेंट्स व सर्जन नोंदणी करू शकतात.

कार्यशाळेचे ठिकाण : भ.क.ल.वालावलकर रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, मु.पो. सावर्डे (डेरवण), ता. चिपळूण, जि. रत्नागिरी. (महाराष्ट्र) ४१५ ६०६.

आयोजक : डॉ. सुनील नाडकर्णी MS, FRCS, (Ed) MCh.

E Mail : sunilnadkarni@gmail.com

नोंदणी व इतर माहितीसाठी संपर्क :

डॉ. नेताजी पाटील :9763551583 / 9834348495
Email : dr.netajipatil1912@gmail.com

डॉ.प्रशांत मुल्या: Mobile : 8087014123
Email : bssdervan@gmail.com

# छोट्या मुलीने गिळला किल्ल्यांचा जुडगा!

दि.२९.११.२०१७ (दुर्गवाडी, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) - कुमारी गौरी लक्ष्मण वाडकर ही १० महिन्यांची मुलगी किल्ल्यांच्या जुडग्याशी खेळत होती. खेळताखेळता तिने तो ७ ते ८ लहान किल्ल्यांचा जुडगा गिळला. श्वासोच्छ्वासाला त्रास होऊ लागल्यामुळे तिचे पालक तिला वालावलकर रुग्णालयात घेऊन आले. तिची प्रकृती अत्यवस्थ झाली होती. रुग्णालयातील कान, नाक व घसा तज्ज्ञ डॉ. संदीप साठे यांनी अत्यंत कुशलतेने व अथक प्रयत्नाने या मुलीच्या घशात अडकलेला किल्ल्यांचा जुडगा काढून तिला जीवनदान दिले. त्यानंतर चार दिवस मुलीला लहान मुलांच्या अतिदक्षता विभागात ठेऊन पुढील योग्य ते सर्व उपचार करून घरी पाठविण्यात आले. ''जवळच असलेल्या या रुग्णालयात आमच्या बाळावर त्वरेने उपचार झाले त्यामुळेच आमचे बाळ वाचले अन्यथा हे शक्य झाले नसते. या रुग्णालयाचे आम्ही अत्यंत ऋणी आहोत.'' असे उद्गार या बाळाच्या आईवडिलांनी रुग्णालयातून घरी जाताना काढले.





# कु. श्रिया शेट्ये यांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

शालेय जीवनापासून ग्रह-तारे यांचे कायम कुतूहल वाटणाऱ्या व त्याच्या अस्तित्वामधील गूढ उकलण्याची नेहमी तीव्र इच्छा बाळगणाऱ्या कु. श्रिया शेट्ये यांचे 'ॲस्ट्रोफिजिक्स या विज्ञान शाखेतील शिक्षण व संशोधनाच्या संधी' या विषयावर श्री विठ्ठलराव जोशी चॅरिटीज ट्रस्ट संचालित इंग्रजी माध्यमाच्या शाळेतील इ. ९वी ते १२वीतील विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन आयोजित करण्यात आले होते.

कु. श्रिया यांनी बी. एस्‌सी. पदवी स्कॉटलण्डमधील ग्लासगो विद्यापीठातून ॲस्ट्रॉनॉमी व ॲस्ट्रोफिजिक्स या विषयात प्राप्त केली. त्यानंतर पुढील संशोधनासाठी त्यांची बेल्जियममधील ब्रुसेल्स विद्यापीठात अभिनंदनीय निवड झाली. तेथे त्या के. यू. ल्युवेन व ब्रुसेल्स या दोन्ही विद्यापीठात डबल पीएच्. डी. करीत आहेत.


*श्रिया शेट्ये मार्गदर्शन करताना*

ब्रुसेल्स विद्यापीठाने त्यांचा प्रवेश केवळ त्या युरोपीय नाहीत म्हणून नाकारला होता. तेव्हा त्यांनी राष्ट्रीयत्व न पाहता आपली मुलाखत घेऊन निर्णय घ्यावा असे ठामपणे सांगितले. त्यांच्या मुलाखतीनंतर त्यांना दोनच दिवसांत ब्रुसेल्स विद्यापीठाने निवड केल्याचे कळविले. भारतात ॲस्ट्रोफिजिक्स या विषयाचे शिक्षण उपलब्ध नाही. म्हणून शिक्षण पूर्ण झाल्यानंतर भारतात परत येऊन या विषयाचे शिक्षण तरुण पिढीला उपलब्ध करून देण्याचा त्यांचा मानस आहे.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना त्यांनी स्वत: करीत असलेल्या संशोधनाविषयी माहिती दिली. त्यांनी पुढे सांगितले की Pure Science चे शिक्षण अतिशय उपयुक्त ठरते. कारण एकदा मूलभूत विज्ञानतत्त्वे समजली की कोणत्याही क्षेत्रात प्रवेश घेण्यासाठी शैक्षणिक श्रेणी सातत्याने उत्कृष्ट ठेवावी लागते. तसेच, IFLTS, TOFEL, GRE परीक्षाही पदवी शिक्षण घेत असतांनाच उत्तीर्ण झाल्यास पुढील वर्ष वाया जात नाही. परदेशी विद्यापीठांबद्दल सर्व माहिती देणाऱ्या Consultancies असतात व त्या विविध विद्यापीठे, तेथील अभ्यासक्रम, उपलब्ध शिष्यवृत्ती यांची माहिती देतात. तसेच प्रवेश अर्ज भरण्यासाठी मदत करतात, प्रवेश परीक्षांची तयारीही करून घेतात. विद्यार्थ्यांनी पदवीपर्यंतचे शिक्षण भारतातच घेऊन पदव्युत्तर अभ्यासासाठी परदेशी जावे, कारण त्यासाठी विद्यापीठाकडून शिष्यवृत्ती मिळते व परदेशात खर्च भागवणे शक्य होते.

शिक्षणसाठी अनेक संधी आज उपलब्ध आहेत. फक्त विद्यार्थ्यांनी आपला कल ओळखून त्या विषयाचे सखोल वाचन, अवलोकन केले पाहिजे, असा बहुमोल सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना स्वानुभवातून दिला. विद्यार्थ्यांनी शेवटी प्रश्न विचारून स्वत:च्या शंकांचे निरसन करून घेतले. कु. श्रिया यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना प्रेरणादायी होते.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळांच्या तालुका स्तरीय हिवाळी स्पर्धा जल्लोषात संपन्न

एस. व्ही. जे. सि. टी. क्रीडा-संकुलात दि. २१ व २२ डिसेंबर २०१७ रोजी जिल्हा परिषद, रत्नागिरी व पंचायत समिती, चिपळूण आयोजित तालुका स्तरीय हिवाळी क्रीडा स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धेत चिपळूण तालुक्यातील ग्रामीण भागातील खेळाडूंनी सहभाग नोंदविला. या स्पर्धेत मोठ्या गटाच्या म्हणजेच १७ वर्षाखालील आणि लहान गटाच्या म्हणजेच १४ वर्षाखालील मुले आणि मुलींसाठी मैदानी खेळ, खो खो, कबड्डी तसेच लंगडी या खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या. डेरवणच्या या अत्याधुनिक क्रीडानगरीत ग्रामीण विद्यार्थ्यांना खेळण्याची संधी दिल्याबद्दल या संस्थेचे सर्व ग्रामीण विद्यार्थ्यांवर ऋण आहे आणि ते पुढे विविध आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये मैदाने गाजवूनच फेडता येईल अशा भावना या वेळी आवर्जून उपस्थित असलेले महाराष्ट्र राज्य शिक्षण संचालक श्री. सतीश मगर यांनी व्यक्त केल्या. या स्पर्धेत चिपळूण तालुक्यांतील ग्रामीण भागातील खेळाडूंना आपले क्रीडानैपुण्य दाखवण्याची संधी मिळाली तसेच ग्रामीण भागातील खेळाडू पुढे यावा व त्याला अत्याधुनिक आणि अंतरराष्ट्रीय क्रीडासुविधांचा लाभ मिळावा अशी भावना या स्पर्धेच्या उद्घाटनासाठी उपस्थित असलेले शिक्षणाधिकारी श्री. एकनाथ अंबोकर यांनी व्यक्त केली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी लक्ष्मीनारायण मिश्रा यांनीही खेळामुळे मन आणि शरीर निरोगी होते, त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी दिवसातील काही तास मैदानावर खेळावे असे सांगून येथील क्रीडासंकुलाचा लाभ ग्रामीण खेळाडूंना मिळत असल्याबद्दल



**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत लक्ष्मण वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र**
श्रीक्षेत्र डेरवण - ४१५६०६, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी
दूरध्वनी : (०२३५५) २६४१४९ / २६४६३६ / २६४६३७ फॅक्स : (०२३५५) २६४१८१
ई-मेल : info@walawalkarhospital.com वेबसाईट : www.walawalkarhospital.com

समाधान व्यक्त केले. जिल्हा परिषद, रत्नागिरी आणि पंचायत समिती, चिपळूण यातील विविध पदाधिकारी या स्पर्धाप्रसंगी डेरवण क्रीडानगरीत हजर होते. याप्रसंगी खास शिक्षकांसाठी शिबिराचे आयोजन केले होते. त्यामध्ये शिक्षकांना संकुलातील सुविधा व प्रशिक्षणाच्या नव्या पद्धती यांची माहिती क्रीडासंकुलातील जलतरण प्रशिक्षक विनायक पवार यांनी दिली आणि खेळाडूंची मानसिकता, खेळाडूंची तंदुरुस्ती याविषयीची माहिती प्रियंका खिंडरे व सोनिया भोसले यांनी दिली. मोठ्या संख्याने उपस्थित प्रेक्षकांनी स्पर्धेच्या जल्लोषात भर घातली.



**भक्तश्रेष्ठ कमलाकरपंत ल. वालावलकर रुग्णालय, रोगनिदान आणि संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण**

**पुणे व मुंबई येथून जानेवारी २०१८ मध्ये येणाऱ्या विविध तज्ज्ञ डॉक्टरांचे वेळापत्रक**

| दिनांक | डॉक्टरांचे नांव | उपचार |
|---|---|---|
| दर शनिवारी | डॉ. सुनील नाडकर्णी, पुणे (एम.एस.ऑर्थो) | अस्थिरोग तपासणी व दुर्बिणीद्वारे मणक्याची शस्त्रक्रिया |
| १४.०१.१८ | डॉ. आनंद जोशी, मुंबई (गॅस्ट्रोएंटरोलॉजिस्ट) | पचनसंस्था तपासणी व उपचार तज्ज्ञ |
| १९.०१. व २०.०१.१८ | टाटा हॉस्पिटल डॉक्टर्स, मुंबई | कॅन्सर शस्त्रक्रिया व उपचार |
| २०.०१.१८ | डॉ. श्रीपाद बाणवली, मुंबई (कर्करोग तज्ज्ञ) | कर्करोग तपासणी व उपचार तज्ज्ञ |
| २०.०१.१८ | डॉ. निषाद ठाकुरदेसाई, मुंबई (फिजिओथेरपिस्ट) | ऑक्युपेशनल थेरपिस्ट |
| २०.०१.१८ | डॉ. सुजाता नाईक, मुंबई (होमिओपॅथिक) | त्वचारोग तज्ज्ञ |
| २०.०१.१८ | डॉ. शिवप्रसाद दाते, मुंबई (प्लास्टीक सर्जन) | भाजलेले व्रण, डाग शस्त्रक्रिया व उपचार |
| २१.०१.१८ | डॉ. अच्युत जोशी, पुणे (नेफ्रोलॉजिस्ट) | किडनी विकार तज्ज्ञ |
| २१.०१.१८ | डॉ. के. एस. कुलकर्णी, पुणे (सायकियाट्रीस्ट) | मानसोपचार तज्ज्ञ |
| २८.०१.१८ | डॉ. के. मंजुळा, मुंबई (नेत्ररोग तज्ज्ञ) | डोळ्याच्या रेटिनाच्या विशेषज्ज्ञ व उपचार |
| २७.०१.१८ ते ०३.०२.१८ | इंग्लंड येथील डॉक्टरांचे शस्त्रक्रिया शिबीर | सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया |
| ०३.०२.१८ | डॉ. सतेज सबनीस, मुंबई (युरोलॉजिस्ट) | दुर्बिणीद्वारे मुतखड्यांचे शस्त्रक्रिया तज्ज्ञ |

**डॉ. सुनील नाडकर्णी दर शनिवारी दुपारी १.०० वाजेपर्यंत UHTC चिपळूण व त्यानंतर वालावलकर रुग्णालय येथे भेटतील.**
**आर्थिकदृष्ट्या दुर्बल कर्णबधिरांना 'ऑडिओमिटर' (कानाचे यंत्र) प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी मोफत मिळेल. यासाठी केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड व त्याची झेरॉक्स आणणे आवश्यक आहे.**
**दि. २२ डिसेंबर २०१८ सरपंच मेळावा । दि. ३.१.१८ डोहाळेजेवण व सासू सून मेळावा । दि. २ आणि ९.१.२०१८ सामुदायिक वाढदिवस**

**मालक, मुद्रक, प्रकाशक :** श्री. विकासराव वालावलकर यांनी मुद्रा, ३८३, नारायण पेठ, पुणे-३० येथे छापून भ.क.ल. वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, रोगनिदान व संशोधन केंद्र, श्रीक्षेत्र डेरवण, जि. रत्नागिरी येथून प्रकाशित केले.
**संपादिका :** डॉ. सौ. सुवर्णा पाटील, **संपादक मंडळ :** श्री. प्रफुल्लराव गोडबोले, सौ. शरयू यशवंतराव, श्री. श्रीकांत पराडकर